नि.दि.दावा ५९/२०१०
दत्तात्रय भानुशाली
वि. खातीजाबेन बोहरी

## नि. ८७ वरील आदेश

१. अर्ज वाचला. वादीने प्रस्तुतचा दावा हा करारपत्राप्रमाणे खरेदीखत होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दाव्यातील नोटरी करारपत्र हे दि.२५/०१/१९८८ रोजीचे आहे. वादीने मुळ करारपत्र दावेकामी दाखल केले आहे. *भारतीय मुद्रांक कायदा, १८९९ च्या कलम ३३ नुसार*, जर एखादा करारनामा न्यायालयात किंवा कोणत्याही सरकारी कार्यालयात पुरावा म्हणून सादर केला गेला आणि तो अपुऱ्या स्टॅम्प ड्युटीवर असेल, तर संबंधित अधिकारी तो दस्तऐवज इम्पाऊंड (जप्त) करण्यास बांधील असतो. दाव्याच्या पुराव्याच्या (Evidence Stage) कोणत्याही टप्प्यावर नोटरी करारपत्र 'इम्पाऊंड' (Impound) करण्यासाठी पाठवता येते. किंबहुना, जर तो दस्तऐवज अपुऱ्या स्टॅम्प ड्युटीवर असेल, तर न्यायालय तो पुराव्यात स्वीकारण्यापूर्वी इम्पाऊंड करणे कायद्याने बंधनकारक आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत आला.

२. दाव्यातील दि.२५/०१/१९८८ रोजीचे मुळ नोटरी करारपत्र जप्त (Impound) करून जिल्हा निबंधक, ठाणे यांचेकडे (CollectorofStamps) यांचेकडे तात्काळ पाठवण्यात यावा.

३. जिल्हा निबंधक यांनी त्या मालमत्तेच्या रेडी रेकनर दराप्रमाणे स्टॅम्प ड्युटी काढून त्यावर थकीत शुल्कासह दंड आकारावा व तो दंड वादीने विनाविलंब भरावा.

४. दंड भरल्यानंतर इम्पाऊंड केलेले मुळ करारपत्र न्यायालयाकडे त्वरीत पाठवावे.

Sd/-

दि. १३.०३.२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

नि.दि.दावा ५९/२०१०
दत्तात्रय भानुशाली
वि. खातीजाबेन बोहरी

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- १३/०२/२०२६

तपासण्याची तारीख :- १३/०२/२०२६

सही केलेली तारीख :- १३/०२/२०२६

अपलोड केल्याची तारीख :- १३/०२/२०२६

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर

दिनांक-१३/०२/२०२६ एस.एस. काकडे
स्थळ - शहापूर (लघुलेखिका नि.श्रे.)